वर्ष- १२ अंक- १२ मुंबई, मंगळवार,३ फेब्रुवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

3 → शब्दाला जागणारा नेता

सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने घेतला गळफास ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

बेलकडी (कामण) जंगल परिसरातील दोन अवैध गावठी दारू भट्ट्यांवर छापा; ३.६७ लाखांचा मुद्देमाल नष्ट

नायगाव - बेलकडी (कामण) जंगल परीसरातील दोन वेगवेगळ्या अवैध गावठी दारु भट्ट्यांवर छापा मारुन ३,६७,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नष्ट केला. नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी. अधिकमाहितीनुसार नायगाव पोलीस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रातील कामण येथील बेलकडी जंगल परीसरात राजेश हडळ हा अवैधरीत्या दारु निर्मितीची भट्टी लावत असल्याची माहीती प्राप्त झाल्याने या माहीतीच्या आधारे नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २५/०१/२०२६ रोजी मौजे बेलकड़ी जंगल परीसरात छापा मारुन गावठी दारु बनविणाऱ्या ०१ भट्टी उध्वस्त करण्यात आली असुन नमुद छापा कारवाई दरम्यान अंदाजे ३०० लीटर गावठी तयार दारु, व इतर साहित्य असा एकुण मिळुन १,६४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तो जागीच नाश करण्यात आला. आरोपी इसमाविरुध्द नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्या नंतर काही वेळाने बातमीदाराने माहिती दिली कि सदर परिसरात चंद्रकांत खरपुडे व संतोष मलावकर काष्टीच्या नाल्यावरती अवैधरीत्या दारु निर्मितीची भट्टी लावत आहे . त्यानुसार नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २५/०१/२०२६ रोजी मौजे बेलकडी जंगल परीसरात छापा मारुन गावठी दारु बनविणाऱ्या ०१ भट्टी उध्वस्त करण्यात आली असुन नमुद छापा कारवाई दरम्यान अंदाजे २५० लिटर गावठी हातभट्टी दारु, व इतर साहित्य असा एकुण मिळुन २,०३,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तो जागीच नाश करण्यात आला. आरोपी इसमाविरुध्द नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अशा दोन्ही कारवाईमध्ये ३,६७,७००/- रुपये अवैध गावठी दारु भट्ट्यांवरील किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, श्री नवनाथ घोगरे, सहायक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/गणेश केकान, पोउपनिरी/ ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, पो. अंम/चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील, पांडुरंग महाले सर्व नेमुणक नायगाव पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

वाहतूक सुरक्षा नियमांबाबत जनजागृती : रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत मार्गदर्शन सत्र

वसई- रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वाहतुक सुरक्षा नियम कायदे याबाबत मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. अधिकमाहितीनुसार रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वसई विकासिनी कॉलेज ऑफ व्हिज्युअल आर्ट वसई पु. येथे वाहतुक नियंत्रण शाखा वसई यांचे तर्फे दिनांक २७/०१/२०२६ रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ च्या अनुषंगाने वाहतुक सुरक्षा नियम कायदे या बाबत मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.सदर कार्यक्रमाची प्रस्तावना सौ. वर्षा गावडे विभाग प्रमुख यांनी केली. डॉ. रिता सावला, राधे फाउंडेशनचे प्रमुख यांनी १०८/१२२ सेवेवर मोफत रुग्णवाहिका साठी कॉल करणे अपघाताची संपुर्ण माहीती देणे, रुग्णवाहिका चालकाने केलेल्या सर्व कॉलला उत्तर देणे, जेणे करुन रुग्णवाहिका अपघाताचे ठिकाणी लवकर पोहोचेल व रुग्णाला हॉस्पिटल मध्ये लवकरात लवकर पोहोचवता येईल. या बाबत मार्गदर्शन केले.

पोनि/सुजतिकुमार गुंजकर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना रस्ता अपघाताच्या कारणांबाबत माहिती दिली, तसेच रस्ता अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन केले व हेल्मेट परिधान करण्याचे महत्त्व सविस्तर पटवून दिले, विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम पाळण्याकरीता आवाहन केले.

सदर कार्यक्रमास श्री. विजय वर्तक (सेक्रेटरी) श्री. दत्तात्रेय ठोंबरे (प्राचार्य) प्रविण शिंदे (सहा. अधिव्याख्याता) सौ. वर्षा गावडे (विभाग प्रमुख) पोनि/ सुजितकुमार गुंजकर पोउपनि/मेहबुब तडवी श्रेणी पोउपनिरी/ प्रभाकर पाटील पोहवा / लालासो बावदाणे मपोशि/काजल पाटील असे उपस्थित राहीले. कार्यक्रमामध्ये एकुण २०० ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी, ४० प्राध्यापक / शिक्षक व सहायक कर्मचारी सहभागी झाले होते.तसेच विद्यार्थ्यांनी हेल्मेट बाबतचे सेल्फी कट आउट मध्ये फोटो काढून हेल्मेट परिधान करण्याकरीता प्रचार व प्रसार करण्याचा निश्चय केला.

त्यानंतर महाराष्ट्र रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ च्या अनुषंगाने मार्गदर्शन सत्र या कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम संपविण्यात आला.

वरिष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत पोपळे सन्मान स्वीकारताना





इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेच्या माध्यमातून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाचा कौतुक सन्मान सोहळा दिनांक 1 फेब्रुवारी 2026 रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे या ठिकाणी संपन्न झाला. ही संस्था शिक्षण, कला व संस्कृतीच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. समाजातील विविध घटकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे, विचारप्रवर्तक उपक्रम राबवणे, तसेच गुणवंत व्यक्ती व कायार्चा योग्य सन्मान करणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

ही संस्था सामाजिक भान, बौद्धिक विकास, सांस्कृतिक जतन व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांद्वारे राष्ट्रउभारणीत सक्रिय योगदान देते. संस्थेचा दरवर्षी वर्धापन दिन साजरा होतो. गेले अनेक वर्ष ही संस्था विविध उपक्रम राबवीत असते.

संस्थेचे सर्व उपक्रम हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, नव्या पिढीला सकारात्मक दिशा देण्यासाठी आणि कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी समर्पित आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती दीपक जोशी, सौ मानसी परब, विजय जाधव, डॉक्टर भूपेंद्र संखे, भरत खांडेकर, लक्ष्मीकांत पोपळे सह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक प्राध्यापक डॉक्टर बी एन खरात यांनी केले. तर सूत्रसंचालनाची जबाबदारी स्नेहल येवला यांनी पार पाडली. ठाणे मुंबई.

उल्हासनगरात रात्री १२ वाजेपासून २४ तास पाणीपुरवठा बंद... शनिवारीही मर्यादित पुरवठा

शनिवारीही कमी दाबाने पुरवठा?
दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर शनिवार, ३१ जानेवारी रोजी कमी दाबाने व मर्यादित प्रमाणात पाणीपुरवठा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन उल्हासनगर महापालिकेचे कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा विभाग) अशोक घुले यांनी केले आहे.

उल्हासनगर । महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) तर्फे जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र तसेच बारवी गुरुत्ववाहिनीवर महत्त्वाचे दुरुस्ती व देखभाल काम हाती घेण्यात आल्यामुळे उल्हासनगर शहराचा पाणीपुरवठा तब्बल २४ तास पूर्णपणे बंद राहणार आहे. गुरुवार, २९ जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते शुक्रवार, ३० जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा पुरवठा बंद राहील.

या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेला होणारा पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प राहणार असून कॅम्प क्रमांक ४, कॅम्प क्रमांक ५ तसेच कॅम्प क्रमांक ३ मधील काही भागांत नागरिकांना पाण्याचा तुटवडा जाणवण्याची शक्यता आहे. एमआयडीसीकडून जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र आणि बारवी गुरुत्ववाहिनीवरील देखभाल व तांत्रिक दुरुस्तीची कामे अत्यावश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवावे व जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

४ अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता! दोघी यापूर्वीही घर सोडून गेल्या होत्या, कुटुंबीय म्हणाले की...

कल्याण। औरंगाबाद येथून ४ अल्पवयीन मुली मागील पाच दिवसांपासून बेपत्ता असल्याची बातमी समोर आली आहे. पीडित मुलींच्या कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, १८ जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या मुलींचा काहीच पत्ता लागू शकला नाही. मुली एखाद्या संघटित टोळीतील लोकांच्या वाईट कृत्याला बळी पडल्या नाहीत ना? अशी त्यांच्या कुटुंबियांना भिती आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. सर्व्हर स्लो असल्याकारणाने फोनचा सीडीआर अद्याप मिळू शकला नाही. हे प्रकरण लवकरच सोडवलं जाणार असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच त्यांनी सांगितलं की, बेपत्ता झालेल्या चार मुलींपैकी दोन मुली यापूर्वी कोणालाही न कळवता दोन वेळा घराबाहेर पडल्या होत्या, परंतु घरी परतल्यानंतर त्यांनी फिरायला गेलं असल्याचं सांगितलं होतं. आता, चार मुली बेपत्ता झाल्याची घटना परिसरात चचेर्चा विषय बनली आहे. मुलींचे कुटुंबीय देखील चिंतेत असून पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत असल्याची माहिती आहे. कुटुंबीय पोलिसांशी सतत संपर्कात आहे आणि प्रत्येक संभाव्य दृष्टिकोनातून प्रकरणाचा तपास केला जात आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रकरणातील सत्य समोर आल्यानंतर आरोपी व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल.

कुटुंबियांनी दाखल केली तक्रार
संबंधित प्रकरण हे देव पोलीस स्टेशन हद्दीतील तिलौता बिगहा गावातील असल्याची माहिती आहे. बेपत्ता असलेल्या मुलींबद्दल अद्याप कोणतीच माहिती हाती लागलेली नाही. घटनेतील एका बेपत्ता मुलीच्या कुटुंबीयांनी इतर तीन मुलींवर त्यांच्या मुलीला फसवल्याचा आरोप केल्यानंतर 18 जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या या मुलींचं प्रकरण उघडकीस आलं आहे. देव पोलीस ठाण्यात कुटुंबियांनी तक्रार दाखल करून मुलीचा लवकरात लवकर शोध घेण्याची मागणी केली.

मद्यधुंद स्कूल बस चालकाची अनेक वाहनांना धडक... वाघोलीमधील बाईफ रोड वादाच्या भोवऱ्यात

पुणे। पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात काल दुपारी अडीच ते पावणे तीन वाजण्याच्या सुमारास एक भीषण आणि धक्कादायक अपघात घडला. इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलची (बायफ रोडवरील) स्कूल बस चालवताना बसचालक मद्यधुंद अवस्थेत होता.

या बसने रस्त्यावरून जात असताना चार दुचाकीस्वार आणि एका कारला जोरदार धडक दिली. धडकेनंतर बसने या वाहनांना काही अंतर फरफटत नेल्याची माहिती समोर आली आहे.

या अपघातात सुदैवाने कोणत्याही व्यक्तीला गंभीर जखम झाली नाही किंवा जीवितहानी झाली नाही. बसमध्ये ३० ते ४० विद्यार्थी होते, ज्यांना घेऊन चालक घरी सोडण्यासाठी निघाला होता. मात्र, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याने ही घटना घडली, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रतिसाद दिला. ते ओरडा-ओरडा करत बसच्या मागे धावले आणि बस थांबवली. संतप्त झालेल्या नागरिकांनी बसचालकाला चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गर्दी जमली आणि काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी बसचालक बत्ता वसंत रसाळ (वय ५० वर्षे, रा. वाघोली) याला तात्काळ अटक केली आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी प्रशांत भगवान धुमाळ (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्कूल बस चालकांनी मद्यपान करून वाहन चालवणे हे अत्यंत गंभीर आणि अस्वीकार्य आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्कूल प्रशासनाने चालकांची नियमित तपासणी, ब्रेथलाइझर चाचणी आणि फिटनेस प्रमाणपत्रांची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. पालक आणि नागरिकांनीही अशा घटनांबाबत सजग राहून तक्रार नोंदवणे गरजेचे आहे. पोलिसांनी या प्रकरणात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असून, बसचालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई होईल. या घटनेनंतर वाघोली परिसरातील रस्ते सुरक्षिततेसाठी अधिकाधिक पावले उचलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



रक्तबंबाळ अवस्थेत घरी आली मुलगी, शेजाऱ्यानेच...

मुंबई । सामूहिक बलात्काराच्या घटनेने दिल्ली पुन्हा हादरली. चिमुकल्या मुलीला नूडल्स देण्याच्या बहाण्याने तिच्यासोबाबत अल्पवयीन मुलांनीच गँगरेप करण्याचा भयंकर प्रकार घडला आहे.

नेमकं काय घडलं?

दिल्लीतील भजनपूर भागात ही घटना घडली असून. १०, १३, आणि १४ वर्षाच्या मुलांनी ६ वर्षाच्या मुलीवर सामूहिक बलात्कार केला आहे. घटनेच्या काही तासांपूर्वी पीडित मुलीला तिच्या वडिलांनी चॉकलेट देऊन घराबाहेर सोडले होते. त्यानंतर त्या ठिकाणाहून तीन आरोपींनीं मुलीला नूडल्स देण्याचे आमिष दाखवत एका बिल्डिंगमध्ये सामूहिक बलात्कार केला. आरोपीनी पीडित मुलीचे हात बांधून आणि तोंड दाबून तिच्यावर हा धक्कादायक प्रकार केला. पीडित मुलगी रक्तबंबाळ अवस्थेत घरी पोचली. तिची ती अवस्था बघून कुटुंबीय घाबरले.

आरोपीचा शोध

मुलीला विश्वासात घेऊन कुटुंबीयांनी विचारले असता तिच्या शेजारी राहणाऱ्या मुलानेच हा प्रकार केल्याचे कळले.

मुलीची अवस्था

मेडिकल रिपोर्ट मधून समोर आले की मुलगी आता चालू शकत नाही, मुलीच्या आईनेही सांगितले की मुलगी उठली किंवा बसली तर तिला प्रचंड त्रास होतोच शिवाय रक्तस्त्राव ही होत आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मुलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतलं तर तिसऱ्याच शोध सुरु आहे.



कूपर रुग्णालय परिसरातील २०० फेरीवाल्यांच्या वाढीव बांधकामांवर कारवाई



मुंबई। अंधेरी (पश्चिम) येथील राम गणेश गडकरी मार्ग (इर्ला मार्ग) परिसरातील सुमारे २०० अनधिकृत फेरीवाले, पदपथांवरील अनधिकृत वाढीव बांधकाम मुंबई महानगरपालिकेच्या 'के पश्चिम' विभागाकडून गुरुवारी २९ जानेवारी २०२६ रोजी हटवण्यात आले. मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निदेर्शानुसार, उप आयुक्त (परिमंडळ-४) भाग्यश्री कापसे यांच्या मार्गदर्शनात, सहायक आयुक्त (के पश्चिम विभाग) चक्रपाणी अल्ले यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

अंधेरी (पश्चिम) येथील स्वामी विवेकानंद मार्ग आणि गुलमोहर मागार्ला जोडून असलेल्या तसेच डॉ. रु. न. कूपर रुग्णालयाच्या प्रवेश मागार्शी संलग्नित राम गणेश गडकरी मार्गावरील (इर्ला मार्ग) पदपथांवर अनधिकृत वाढीव बांधकामे आढळून आली होती. तसेच, या परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांनीही दुकाने उभी केल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे, कूपर रुग्णालयात अणीबाणीप्रसंगी रुग्णांना घेऊन येणाऱ्या रुग्णवाहिकांना मार्गक्रमण करण्यास तसेच पादचाऱ्यांना पदपथांवरुन चालण्यास अडथळा निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेच्या 'के पश्चिम' प्रशासकीय विभागाकडून हटवण्याची मोहीम हाती घेण्यात आली. या अंतर्गत, या परिसरातील सुमारे २०० अनधिकृत फेरीवाले, पदपथांवरील अनधिकृत वाढीव बांधकामांवर कारवाई करण्यात आले.

जन्मदात्या आईनेच ११ वर्षांच्या मुलाला संपवलं

मुलीवरही सपासप हल्ला, रक्ताने माखलेलं घर पाहून पोलीसही सुन्न



महिलेची ओळख काय?
ही घटना वाघोली येथील बाईफ रोड परिसरात घडली. सोनी संतोष जायभाय (मूळ रहिवासी कंधार, जिल्हा नांदेड) सध्या वाघोली येथे बायफ रोडवर वास्तव्यास असलेल्या या महिलेने हे कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत ११ वर्षांचा मुलगा साईराज संतोष जायभाय याचा जागीच मृत्यू झाला. तर १३ वर्षांची मुलगी धनश्री संतोष जायभाय गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पुणे। पुण्यात एक हादरवणारी घटना घडली असून, पोलीस यंत्रणांनाही घटनेमुळं धक्का बसला आहे. पुण्यातील वाघोली इथं आईच्या हातून एक धक्कादायक कृत्य घडलं आहे, जिथं ११ वर्षांच्या मुलाची हत्या झाली असून, आईनंच मुलीवरही प्राणघातक हल्ला केला.

पुण्यातील वाघोली परिसरातून एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. एका आईने स्वतःच्या ११ वर्षांच्या मुलाचा गळा चिरून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. याच घटनेत १३ वर्षांच्या मुलीवरही प्राणघातक हल्ला करण्यात आला असून, सुदैवाने ती मुलगी बचावली आहे. वाघोलीत अवघ्या दोन दिवसांत घडलेली ही दुसरी निर्दयी घटना असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

वाघोलीतील या घटनेनंतर सदर परिसरात प्रचंड तणावाचं वातावरण पाहायला मिळत आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी आरोपी महिलेला ताब्यात घेतलं असून, नेमकं हे कृत्य का करण्यात आलं, याचा तपास सुरू आहे. मात्र अद्याप हत्येमागचं गूढ कायम आहे. हत्या करण्यामागे कौटुंबिक वाद की मानसिक तणाव? यामागचं नेमकं कारण शोधण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत. वाघोलीत सतत घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांचं अशा घटनेकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे अशी कुजबूज स्थानिकांमध्ये पाहायला सुरू आहे. मात्र आता या हादरवणाऱ्या घटनेनंतर पोलीस तपासातून नेमकी कोणती बाब आणि गुपितं उघडकीस येतात हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

व्हेज खिमा रोल

साहित्य: सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



कृती: सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.

कित्येक शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.



जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे

▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

ॲप कसे काम करते?

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा

ठरतोय नैराश्याचं कारण

वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.



वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

डोळ्यात कचरा गेल्यावर करा 'हे' उपाय

डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदूषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहोचू शकते. वातावरणातील धूलिकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

▮सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.



▮डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.

▮डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असताना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरू नये.

▮डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

▮अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते, अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.

केस आणि त्वचेसाठी औषधी तेल



सध्या केसांच्या समस्या वाढताना दिसताहेत. प्रदूषणाचं प्रमाण वाढत असताना केस आणि त्वचेवर त्याचा स्पष्ट परिणाम दिसतो. मात्र केसांवर अधिक परिणाम दिसण्याची अनेक कारणं आहेत. सध्या केसांचं सौंदर्य आणि स्वच्छता राखताना अनेक रसायनयुक्त प्रसाधनांचा वापर वाढतोय. दर्जा न बघता खरेदी केलेली अशी प्रसाधनं केसांच्या मुळांनाच हात घालतात. तीव्र प्रसाधनांमुळे केसांची मुळं कमकुवत होतात, केसांचा पोत बिघडतो आणि तक्रारींची मालिका सुरू होते. यावर उपाय म्हणून आठवड्यातून एकदा किंवा दोनदा तेलाचा मसाज करणं हा पर्याय आहे. यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं, त्याचप्रमाणे डोकेही शांत राहतं. पण केवळ तेल पुरेसं नाही. काही उपायानं हे तेल अधिक उपयुक्त बनवता येऊ शकतं.



▮तिळाच्या तेलात मेथीदाणे भिजत घाला. आता हे तेल मंद आचेवर गरम होऊ द्या. तेल गार झाल्यावर गाळून मेथीदाणे बाजूला करा. आता हे तेल अधिक औषधी आणि परिणामकारक आहे.

▮केसांसाठी आवळ्याची उपयुक्तता आपण जाणतो. आवळे उकळवा. आता हे मऊसर आवळे कूकरमध्ये ठेवून चार-पाच शिट्या करा. आवळ्याचा गर निघेल. हा गर गाळून घ्या. आता या मिश्रणात हवं ते तेल एकत्र करा आणि अर्धा तास गरम करा. थंड झाल्यावर तेल बाटलीत भरून ठेवा. या तेलानं केलेला मसाज अधिक चांगला परिणाम देईल.

▮सुकलेला आवळा तेलात मिसळा. तेल उकळू द्या. थंड झाल्यावर आवळ्यासहित तेल बाटलीत भरा.

▮खोबरेल तेलात बदाम मिसळा आणि तेलाला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यानंतर तेलाचा रंग बदलेल. रंग बदलल्यावर तेल आचेवरून उतरवा आणि थंड झाल्यावर बाटलीत भरून ठेवा.

▮खोबरेल तेलात मेथीदाणे घालून चार-पाच दिवस तसेच ठेवा. त्यानंतर गाळून तेल बाटलीत घाला. हे तेल अधिक उपयुक्त झालेलं असेल.

प्रत्येक रुग्णाला हे पाचही उपचार केलेच पाहिजेत, असे आवश्यक नाही. रुग्णाची प्रकृती, आतापर्यंत झालेली मोठमोठी आजारपणे, वय, कुठला ऋतू सुरू आहे या सर्वांचा विचार करून वैद्य रुग्णाला नेमका कुठला उपचार द्यायचा हे ठरवतात. पंचकर्मामध्ये वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे शोधन करायचे असते.

वात, पित्त व कफ हे तीन दोष संतुलित असतील तर कोणताही रोग होत नाही. मात्र यांच्यापैकी एखादाही दोष वाढला असेल, तर शरीरात रोग निर्माण होत असतो. हे तीन दोष वाढण्याच्यादेखील वेगवेगळ्या श्रेणी असतात. त्यानुसार उपचार निश्चित केला जातो. साधारणतः अन्न पचन न होणे, तोंडाला चव नसणे, स्थूलपणा, ॲनिमिया, जडत्व, अंग गळून जाणे, अंगावर पित्त उठणे, सर्वांगास कंप सुटणे, सर्व अंग जखडणे, कामात लक्ष न लागणे, अतिशय आळस येणे, थोडे श्रम करताच दम लागणे, अकारण अशक्तपणा येणे, सर्वांगास दुर्गंधी येणे, वारंवार कफ होणे, वारंवार पित्त होणे, निद्रानाश किंवा अतिशय झोप येणे, नपुंसकता येणे, वाईट स्वप्ने पडणे, शरीराचा वर्ण काळवंडणे ही लक्षणे दिसली तर पंचकर्म उपचार देणे अतिशय लाभकारक असते.

पंचकर्म उपचार करताना रोग्याची शक्ती पाहिली जाते. हे उपचार सोसण्याची ताकद रुग्णामध्ये असली पाहिजे. वात, कफ व पित्त हे तीन दोष शरीरात वाढले असतील. सर्व शरीरात पसरले असतील व ते साम अवस्थेत असतील तर ते दोष वाढलेले असूनदेखील पंचकर्माद्वारे तसेच्या तसे बाहेर काढता येत नाहीत. साम अवस्थेतील रोग्याचे शोधन केल्यास रोग्याला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पाचन, स्नेहन व स्वेदन हे तीन पूर्व उपचार केले जातात व तद्नंतर पंचकर्म उपचार केले जातात.

वैद्यांनी सांगितलेले पथ्य व इतर सूचनांचे पालन करणे शक्य नसेल, तर पंचकर्म करू नये आणि स्वतःच्या मनाने तर अजिबात करू नये. पंचकर्म उपचारांचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून काही सूचना लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अतिशय मोठ्या आवाजात बोलू नये. कुठल्याही वाहनाने प्रवास करू नये. जास्त चालू-फिरू नये. एकाच जागी जास्त बसून वा पडून राहू नये, अति खाणे किंवा अजीर्ण टाळावे. वैद्यांनी सांगितलेलाच आहार घ्यावा आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे.

पंचकर्माने रोग शरीरातून समूळ नष्ट होतो. परंतु काही इतरही याचे फायदे आहेत. शरीरात अग्नी प्रदिप्त होतो. शरीराला व मनाला स्वस्थता मिळते. इंद्रिये प्रसन्न होतात. मन व बुद्धी आपापल्या कार्यांमध्ये उत्कर्ष करतात. शरीराचा वर्ण व कांती उजळते. त्वचा तजेलदार दिसू लागते. कार्यशक्ती म्हणजे स्टॅमिना वाढतो. शरीर पुष्ट व भारदार होते. वृद्धावस्था लवकर येत नाही. संतती नसलेल्यांना संततीप्राप्ती होते. निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य मिळते. पंचकर्म उपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावा, त्याने दुष्परिणाम होत नाहीत. हे सर्व फायदे मिळवायचे असतील तर पंचकर्म उपचार वर्षातून किमान एकदा तरी करून घेतलाच पाहिजे.



पंचकर्म म्हणजे काय?

पंचकर्म ही आयुर्वेदाची एक वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा आहे. प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली ही उपचार पद्धती आहे. यामध्ये रोग बरा करण्यासाठी एखादे औषध देऊन शरीरातच तो रोग जिरवून न टाकता तो रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे रोग समूळ नष्ट होतो. अर्थात तो रोग पुन्हा डोके वर काढत नाही व रोग समूळ नष्ट होतो. अशा रीतीने रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याच्या प्रक्रियेला शोधन क्रिया म्हटले जाते. मात्र त्याचबरोबरच बृहन, लंघन, स्नेहन, रुक्षण, स्वेदन व स्तंभन हे सहा उपक्रमही केले जातात. परंतु पंचकर्म उपचारात वमन, विरेचन, बस्ती, नस्य व रक्तमोक्षण हे प्रमुख व अत्यंत महत्त्वाचे असे उपचार आहेत.

पावसाळ्यात पाणी पिताना अशी घ्या काळजी...

दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते, तिथे तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...

पाणी गाळून घेणे

वॉटर प्युरिफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणीने पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चांगल्या सोसायटीमध्ये राहतो, त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते, असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.



उकळणे

पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीवजंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे.

उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरून जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

तुरटी फिरवणे

तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

नळाला फिल्टर बसवणे

पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारे वेगवेगळे फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरू शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

संपादकीय

शब्दाला जागणारा नेता



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजितदादांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते. शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभे राहिले नाहीत, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी 'कामाचा नेता' होते. अजित पवार म्हणजे एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी त्यांची ओळख. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प हाताळला. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. 'सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही' हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले.

अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणापेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड ठेवणे, निर्णयांची अंमलबजावणी करून घेणे आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अर्थसंकल्पीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकाऱ्यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली. अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले. लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधीकधी बोचऱ्या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख. ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली. सत्तेत असो वा विरोधात; अजितदादांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली. अजित पवार हे कार्यक्षम, परंपरागत राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारणारे नेते होते. स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, कठोर प्रशासकीय भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे अजित पवार यांची ओळख एक कठोर प्रशासक नेता अशी निर्माण झाली. ते केवळ राजकारणी नसून एक कार्यक्षम प्रशासक म्हणूनही ओळखले गेले. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे पुतणे होते; मात्र त्यांनी केवळ घराणेशाहीच्या जोरावर राजकारणात स्थान मिळवले, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी अनेक वेळा समर्थपणे सांभाळल्या. अधिकारी वर्गाला थेट प्रश्न विचारणे, वेळेची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि निकालाभिमुख प्रशासन यावर त्यांचा भर असायचा. अनेक वेळा त्यांच्या भाषेतील रोखठोकपणा चर्चेचा विषय ठरायचा; मात्र काम लवकर आणि प्रभावीपणे पूर्ण व्हावे, हाच त्यामागील उद्देश असायचा. जलसंपदा मंत्री असताना त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली. अवघड परिस्थितीतही निर्णय घेण्याची त्यांची तयारी असायची. राजकीय धाडस, सत्ता संतुलनाचे भान आणि प्रसंगी आक्रमक भूमिका घेण्याची क्षमता यामुळे ते वेगळे ठरले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांनी राज्याच्या आर्थिक नियोजनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प मांडताना वास्तववादी आकडे, विकासावर भर आणि वित्तीय शिस्त यांचा समतोल साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून आला. कठोर प्रशासक असूनही अजितदादांनी जनतेशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. दौरे, आढावा बैठक, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी यामुळे ते जमिनीवरील वास्तव जाणून घेत. बारामती मतदारसंघातील विकासकामे हे दादांच्या कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण मानले गेले. ते लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देत. त्यांच्या मते, प्रशासन हे शिस्त, वेग आणि निर्णयांवर चालते. त्यामुळेच त्यांना 'कठोर पण कार्यक्षम प्रशासक' अशी ओळख मिळाली. त्यांच्या कार्यशैलीवर टीका होत असली, तरी राज्याच्या प्रशासनात गती, शिस्त आणि विकासाचा दृष्टिकोन रुजवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता मात्र ही सर्व चर्चा थांबणार आहे. राज्यातील जनता नेहमीच त्यांना आठवणींमध्ये जपणार आहे. शरद पवार ८० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत होते. पवार कुटुंबातील इतर कोणीही सदस्य राजकारणात सक्रिय नव्हते. तेव्हा १९८२ पासून २३ वर्षांचा एक युवक थोरल्या पवारांच्या आजूबाजूला घिरट्या घालत होता. हा युवक पुढे महाराष्ट्राच्या राजकारणातील 'दादा' होईल, याचा कुणालाही अंदाज नव्हता. मात्र, को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरी बोर्ड सदस्य असतानाच १९९१ मध्ये या तरुणाने थेट संसदेत प्रवेश केला. तेव्हापासून महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर अजित पवार नावाचा तारा चमकू लागला. ती चमक अगदी २८ जानेवारीच्या सूर्योदयापर्यंत कायम होती. बारामतीमध्ये विमान उतरताना दुर्घटना घडली आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाच जणांचा बळी गेला. या घटनेमुळे महाराष्ट्र सुन्न झाला. इतका धडाडीचा नेता आपल्यातून अचानक जातो, यावर विश्वास ठेवणे अजूनही शक्य होत नाही. मात्र, वास्तव स्वीकारणे भाग आहे. अत्यंत वक्तशीर असलेल्या अजित पवारांनी वेळेच्या आधीच एक्झिट घेतल्याची प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे. काका शरद पवारांचे बोट पकडून अजित पवार बारामतीमधून राजकारणात शिरले आणि त्याच भूमीत त्यांना अखेरची विश्रांती मिळावी, हा निव्वळ योगायोग की नियतीचे काही संकेत म्हणायचे? तरीही नियतीचे संकेत म्हणता येणार नाहीत, कारण अजित पवार शिव-शाहू-फुले आणि आंबेडकरी विचारांवर चालणारे पुरोगामी नेते होते. त्यांनी कधीही जातीय राजकारण केले नाही. कधीही हाताला गंडे, दोरे बांधले नाहीत. कामाला देव मानले आणि अखंड कामात व्यग्र राहिले. महाराष्ट्राच्या राजकीय मुशीत तयार झालेल्या नेत्यांमध्ये अजित पवारांचा बाज अगदी निराळा होता. ते अजित पवारांचे 'अजितदादा' बनले. त्यानंतर दादा म्हणून लोकप्रिय झाले. तरीही ते रुढार्थाने दादा नव्हते. कामात वाघ, बोलण्यात दरारा आणि मिश्किल स्वभाव ही त्यांची ओळख होती. आत एक आणि बाहेर एक, असा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यामुळे जे काही आहे ते अजितदादा तोंडावर रोखठोक बोलायचे. त्यांचा स्वभाव सर्वांना ठाऊक असल्यामुळे अजितदादा कितीही चिडले तरी काही क्षणातच त्यांचा स्वर समजावणीचा व्हायचा आणि समोरचा माणूस त्यांच्या प्रेमात पडायचा. रांगडा स्वभाव, रांगडी बोली तरीही मनमिळावू स्वभावामुळे अजित पवारांना कुणीही विरोध केला तरी तो दीर्घकाळ टिकत नसे. शिवाय काम करण्याची आणि काम करून घेण्याची त्यांची हातोटी यामुळे प्रशासनावर त्यांची जरब होती. अनेकदा प्रशासनातले अधिकारी मंत्र्याला गुंडाळण्यात वाकबदार असतात. मात्र, अजित पवार पूर्ण तयारीनिशी येत असल्यामुळे त्यांना गुंडाळणे शक्य होत नसे. त्यामुळे अजित पवारांचाच प्रशासनावर वचक दिसायचा. अजितदादा पहाटे उठायचे. अनेकदा ते भेटायला येणाऱ्यांना सकाळी सहाची अपॉईंटमेंट द्यायचे. कुणाला भेटायची वेळ दिली की ती ते काटेकोरपणे पाळायचे. शिवाय दिलेल्या वेळेआधीच ते हजर असायचे. वक्तशीरपणा त्यांच्या रक्तात भिनला होता. मुंबईत, इतरत्र किंवा पुण्यातही मेट्रोची किंवा इतर कामांची पाहणी करण्यासाठी ते सकाळी लवकर जायचे. त्यामुळे अधिकारीही त्यांना वचकून राहात होते. अजित पवार यांचा हा गुण राजकारणात विरळच होता. कामात त्यांना वाघ म्हटले जायचे, कारण त्यांच्याकडे जे खाते असायचे त्याचा ते प्रचंड अभ्यास करायचे. राज्याचा अर्थसंकल्प त्यांनी ११ वेळा मांडला. यावरून त्यांच्या अर्थ खात्याच्या आकलनाची कल्पना येते. शिवाय सिंचन, ग्रामविकास, बांधकाम आदी क्षेत्रांचेही त्यांना खूप चांगले ज्ञान होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठीही ते तयारी करून जायचे. त्यामुळे मोठमोठे अधिकारीही त्यांना जरा टरकून असत. अजित पवार तब्बल सहावेळा उपमुख्यमंत्री होते. त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हायचे होते, आणि हे त्यांनी बोलूनही दाखवले होते. मात्र, त्यांच्या पदातून 'उप' कधीच निघाला नाही, याची खंत अजित पवार यांना कायम सलत राहिली. वास्तविक २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला 71 आणि काँग्रेसला ६९ जागा मिळाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्रीपद मिळणे अपेक्षित होते. त्यावेळी अजित पवारांची राजकीय कारकीर्द १३ वर्षांची होती. त्यामुळे अजित पवार मुख्यमंत्री बनणार अशी चर्चा होती. मात्र, काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री बनले आणि अजित पवारांची ती संधी चुकली ती कायमचीच! त्यानंतर त्यांना कायम मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली. शिवाय सिंचन घोटाळ्याचा डाग ते पुसू शकले नाहीत, याचेही शल्य त्यांना होते. १९९१ मध्ये ते पूर्णवेळ राजकारणात आल्यानंतर थेट खासदार बनले. मात्र, त्यांचे मन दिल्लीत रमले नाही. त्यामुळे चार-महिन्यांतच ते महाराष्ट्रात आले आणि बारामती मतदारसंघातून विधानसभेत गेले. तेव्हापासून सलग आठवेळा ते विधिमंडळात आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असा प्रवास करत २०२२ मध्ये त्यांनी काही आमदार घेऊन ते शरद पवारांच्या राजकारणापासून वेगळे झाले आणि सत्तेत सहभागी झाले. त्यानंतरही त्यांच्या स्वभावात बदल झाला नाही. स्वतःला झोकून देत ते काम करत होते. त्यांच्या स्वभावातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रोखठोक बोलणे! एखादे काम होणार नसेल तर ते नाही सांगायचे. नंतर पाहतो, करतो असे थातूरमाथूर बोलून वेळकाढूपणा करत नसत.

ठाकरे बंधू आत्मपरीक्षण करणार का?



मुंबईसह महाराष्ट्रातील इतरही महानगरपालिकांच्या निवडणुका अखेर पार पडल्या. भारतीय जनता पक्षाने जवळपास निम्मे नगरसेवक निवडून आणताना २९ पैकी २३ महापालिकांमध्ये स्वबळावर किंवा सहकारी पक्षाच्या मदतीने महापौर निवडता येईल इतके बहुमतही मिळविले, भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विजयाचे शिल्पकार ठरले. सर्वाधिक उत्कंठा होती ती मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची; त्यातही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना कशी कामगिरी करते याची. ठाकरे यांच्या पक्षाला मुंबई महापालिकेतील सत्ता गमवावी लागली. मुंबईत भाजपला स्वबळावर महापौर निवडता येणार नसला तरीही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी असलेल्या युतीच्या मदतीने मुंबईत महापौरपद व सर्व सत्तापदे मिळविण्यामध्ये भाजप यशस्वी ठरणार हे स्पष्ट झाले आहे. साहजिकच आता प्रश्न आहे, उद्धव बाळासाहेब ठाकरे व त्यांचा पक्ष आत्मपरीक्षण करणार का?

मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेने गेली पंचवीस वर्षे सत्ता गाजविली. अर्थात या सर्व वेळेस भारतीय जनता पक्षाशी त्यांची युती होती, या युतीमध्ये भाजप नेहमीच लहान भावाच्या भूमिकेत राहिला. उपमहापौरपद व एखाद्या समितीचे अध्यक्षपद यापलीकडे भाजपच्या हातात काहीच आले नाही. इतकेच कशाला, २०१७ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे ८४ तर भाजपचे ८२ नगरसेवक निवडून आल्यानंतर भाजपने त्या पदांवरील हक्क सोडून सर्व पदे शिवसेनेला देऊ केली होती. त्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांपर्यंत युती कायम होती; पण २०१९मध्ये उद्धव ठाकरे यांनी निकालानंतर थेट काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत आघाडी करीत महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली आणि या युतीमध्ये बिघाड झाला. त्यापूर्वी २०१४च्या विधानसभा निवडणुकीमध्येही युतीमध्ये बिघाडी झाली होती, पण त्यानंतर सावरून घेण्याचीच भूमिका भाजपने घेतली होती. साहजिकच या निवडणुकीमध्ये काय होणार, असा प्रश्न होता. भाजप व शिवसेना युतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे व राज ठाकरे यांच्या शिवसेना व मनसे आघाडीवर निर्विवाद विजय मिळवून या प्रश्नाचे उत्तर दिले.

उद्धव ठाकरे यांच्या नगरसेवकांची संख्या गेल्या निवडणुकीपेक्षा कमी म्हणजे ६५ पर्यंत घसरली. राज ठाकरे यांची कामगिरीही घसरून सहापर्यंत आली. त्यांच्या आघाडीला ७१ जागा मिळाल्या. भाजपने गेल्या निवडणुकीपेक्षा सात जागा अधिक जिंकल्या. शिंदे यांच्या शिवसेनेशी त्यांची युती होती. त्यामुळे शिंदेंच्या २९ जागा या देखील भाजपच्या बाजूने मोजल्या, तर ८९ अधिक २९ म्हणजेच ११८ जागा होतात. साहजिकच आकड्यांच्या भाषेमध्ये ठाकरे बंधूंची पीछेहाट झाली. अर्थात हे फक्त मुंबईत नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातले चित्र आहे. राज ठाकरे यांच्या मनसेची स्थिती त्याहून बिकट आहे.

वास्तविक शिवसेना सातत्याने मराठी माणूस, मराठी अस्मिता व मुंबईतील मराठी माणसाचे अस्तित्व या विषयावर संघर्ष करीत आली आहे, किंबहुना त्या पक्षाची उभारणीच या विचारावर झाली आहे. या निवडणुकीमध्ये तब्बल अठरा वर्षांनी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले. त्यांनी मुंबईतील मराठी माणसाच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणून साथ द्या, अशी साद घातली. मराठीबहुल भागामध्ये शिवसेनेला मराठी मतदारांनी साथ दिलीही. पण त्यामुळे उर्वरित मुंबईमधून शिवसेनेला नेहमी मिळणारी साथ या वेळेस मिळाली नाही. मराठी विरुद्ध अमराठी असे झालेले ध्रुवीकरण हे भाजपच्या फायद्याचे ठरले आणि शिवसेनेने स्वतःचे नुकसान करून घेतले. टोकाला जाऊन मराठी अस्तित्वाची लढाई येथपर्यंत कथानक नेल्याने, आता यापुढे काय, असा प्रश्नही निर्माण होतो. ठाकरे बंधूंनी आपली शेवटची हुंडी वटविण्याचा प्रयत्न केला, त्याला मर्यादित यश आले.

खरे तर ठाकरे बंधूंकडे भरपूर वेळ होता. निवडणुका फेब्रुवारीअखेरपर्यंत घ्या, असे न्यायालयाने जाहीर करण्यापूर्वीही महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सगळ्यांना माहीत होते. या दोन बंधूंनी एकत्र निवडणूक लढवायची हे जूनमध्येच ठरविले होते. पण तपशील ठरविण्यासाठी त्यांना सहा महिने लागले. बहुधा दोन्ही ठाकरे एकत्र आले म्हणून मराठी माणूस भारावून जाऊन त्यांना भरभरून मतदान करील, अशी त्यांची अपेक्षा होती; पण तसे घडले नाही. मुंबईत असलेले शाखांचे जाळे ही शिवसेनेची ताकद होती. गेल्या वेळेस निवडून आलेल्या ८४ नगरसेवकांपैकी निम्मे नगरसेवक शिंदे यांच्या पक्षात गेले होते. हे जाळे खिळखिळे झाल्याची जाणीव ठाकरे बंधूंना होती. विधानसभा निवडणुकीमध्ये त्याचे परिणामही त्यांनी भोगले होते. तरीही हे जाळे पुन्हा विणण्यासाठी कोणतेही प्रयत्न करताना ठाकरे दिसले नाहीत. अगदी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यामध्ये शाखा भेटींना प्रारंभ झाला. वास्तविक उद्धव व आदित्य ठाकरे यांनी ठरविले असते तर गेल्या वर्षभरात त्यांना हे जाळे पूर्ववत करणे शक्य होते, पण तसे घडले नाही. बहुधा आपण लोकांमध्ये मिसळलो तर आपली 'ब्रँड व्हॅल्यू' कमी होईल, असे त्यांना वाटले असावे.

या निवडणुकांत उद्धव काँग्रेसपासून दूर गेले, ही त्यांच्या दृष्टीने वाईट गोष्ट होती. एकूण मतांची टक्केवारी पाहिली तर गेल्या काही निवडणुकांत मनसेच्या मतांच्या किमान दुप्पट ते अडीचपट मते काँग्रेसला मुंबईत मिळतात. साहजिकच काँग्रेसपासून दूर गेल्याचा फटका ठाकरे यांना बसला. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसबरोबर असल्याचा सर्वाधिक फायदा त्यांना झाला होता. त्यातच मुस्लिम व दलित मतदारांनी शिवसेनेला या वेळी फारशी साथ दिली नाही. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये मुंबईमध्ये या दोन्ही मतदारांनी शिवसेनेला मनापासून साथ दिली होती. आपली पारंपरिक मतपेढी शिवसेनेकडे सरकते आहे, असे मानणारा मोठा कार्यकर्ता वर्ग काँग्रेसमध्ये होता. तो आपल्या पक्षश्रेष्ठींना वारंवार ते सांगतही होता. या निवडणुकीमध्ये काँग्रेसने स्वतंत्र लढण्याची घेतलेली भूमिका व वंचित विकास आघाडीबरोबर आघाडी करण्याचा निर्णय हे त्याचेच निदर्शक होते.

मुस्लिम मतदार पूर्वीप्रमाणे आजही एकगठ्ठा मतदान करतो, पण पूर्वीप्रमाणे तो विशिष्ट पक्षाला बांधलेला नाही. पूर्वी तो काँग्रेसशी घट्ट बांधलेला होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष यांना थेट विरोध करण्याची ताकद ज्याच्यामध्ये आहे, त्याच्यामागे हा मतदार मोठ्या संख्येने उभा राहतो. महापालिका निवडणुकीमध्ये त्यांनी काँग्रेसबरोबरच 'एमआयएम'मागे आपली ताकद उभी करणे पसंत केले.

मुंबईवर लक्ष केंद्रित करताना ठाकरे बंधूंनी इतर शहरांमधील कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले. त्यांच्या प्रचाराचा सर्व भर मुंबईपुरताच मर्यादित राहिला. साहजिकच त्यांच्याकडे मोठ्या आशेने बघणाऱ्या राज्यभरातील कार्यकर्त्यांना त्यांनी निराश केले. त्याचाच परिणाम म्हणून मतदारांनीही त्यांच्याकडे साफ पाठ फिरवली. परभणी व नाशिक सोडले तर इतरत्र त्यांचा पक्ष दोन आकडी संख्या गाठू शकला नाही. अनेक ठिकाणी शून्यावरच समाधान मानावे लागले. त्यामुळे आता तरी त्यांना आत्मपरीक्षण गरजेचे आहे. मराठीचा मुद्दा मुंबईत लागू असला तरीही महाराष्ट्रात त्याचे अपील शून्य आहे. अशा स्थितीत ठाकरे बंधूंना आपल्या पक्षाची बांधणी पुन्हा करावी लागेल. पुढील तीन वर्षे कोणत्याही निवडणुका होणार नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांना देण्यासारखेही काही नसेल. त्या स्थितीत हे आव्हान अधिक बिकट होणार आहे. त्याची जाण ठेवून संपूर्ण महाराष्ट्र किमान आदित्य ठाकरे यांनी पालथा घातला तरीही त्यांना ही अस्तित्वाची लढाई लढण्यासाठी बळ मिळेल. प्रश्न एवढाच आहे, की ठाकरे बंधू आत्मपरीक्षण करणार का?

घुसमटलेल्या मुंबईकराचा विस्फोट

मुंबई लोकलमध्ये यापूर्वी आपण बॉम्बचे विस्फोट घडवून आणल्यामुळे त्यात अनेक प्रवाशांचे जीव गेलेले पाहिले आहे, पण आता लोकलच्या भयंकर गर्दीला आणि चेंगराचेंगरीला कंटाळून त्यातील प्रवाशांचेच विस्फोट होऊन लागले आहेत. किरकोळ धक्का लागल्याच्या रागातून महाविद्यालीन प्राध्यापकांची पोटात चाकू खुपसून हत्या झाल्याचा प्रकार मालाड रेल्वे स्टेशनवर शनिवारी घडला. मुंबईच्या लोकल ट्रेनमधून ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये सर्वच वयोगटातील, व्यवसायातील, नोकरी करणारे, मजूर, खासगी तसेच सरकारी कर्मचारी असे सगळेच असतात. सकाळच्या वेळेत मुंबईकडे जाणारे आणि सायंकाळी पुन्हा विरार, वसई, कर्जत कसाऱ्याकडे परतणारे नियमित लोकल प्रवासी वर्षानुवर्षे प्रवास करत आहेत. लोकल प्रवासातील घुसमट, गर्दी, चेंगराचेंगरी आणि प्रवाशांनी 'प्रवासादरम्यान पत्करलेला जीवाचा धोका' रोजचाच असताना प्रवासीही त्याच्याशी जुळवून घेतात, त्यामुळे शक्यतो हाणामाऱ्या जरी झाल्या तरी हत्येचा प्रकार सहसा घडत नाही. प्रवाशांच्या हाणामारीत एका प्रवाशाने दुर्सया प्रवाशाला रेल्वे रुळावर ढकलून दिल्याने गाडीखाली सापडून प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना दोन वर्षांपूर्वी घडली होती. दरवाजात लटकलेल्या प्रवाशाचे खाली पडणे, रेल्वे रुळ ओलांडताना झालेले अपघात नवे नाहीत. उंट म्हातारा झाला की मालक त्याला वाळवंटात जिवंत गाडून मोकळे होतात, इतर उंट आपला भविष्यकाळ हतबल नजरेने पाहात असतात, असंच काहीसं चित्र रेल्वे अपघातात पाहायला मिळतं. लोकलच्या कोंडवाडावजा डब्यात जनावरासारखी भरली जाणारी माणसांची जीवघेणी गर्दी पाहिल्यावर मन विषण्ण होतं. भाकरीसाठी जीव धोक्यात घालणाऱ्या मुंबई ठाणेकरांचं स्पिरीटच्या नावाखाली होणारं 'हतबलतेचं कौतुक' आधी बंद व्हायला हवं. रेल्वेचा प्रवास रोजच माणसांना मारत असताना प्रवासी एकमेकांची शक्य तेवढी काळजी घेतात. आता प्रवासीच एकमेकांना मारायला लागल्यावर हे 'रोजचंच' आहे असं बोलून हा विषय सोडून देत येत नाही. रविवारी सुट्टीच्या दिवशीही मेगा ब्लॉकच्या जीवघेण्या दिव्यातून कुटुंबाला लोकलगर्दीत ढकलणारेही कमी नाहीत. लोकल गर्दीत चढता-उतरताना चेंगरल्याने लहान मुलांची रडारड, आयाबाया, म्हाताऱ्याकोताऱ्यांची जीवघेणी रविवारची कसरत टाळता येणार नाही का? महिलांच्या डब्यातील हाणामारी, चढताना-उतरताना होणारी दमछाक, धक्काबुक्की त्यातून होणारी हाणामारी तेवढ्यापुरती असली तरी ती कमालीची हिंसक असते. घर, कुटुंब, कार्यालय, भवतालचा तणाव, रागाला लोकल प्रवासात तोंड फुटते, हा मनात खदखदत असलेला दबलेला ज्वालामुखी स्फोटासारखा बाहेर येतो आणि सगळा राग, तणाव रिकामा करण्याचं साधन लोकल प्रवासात उपलब्ध होतं. केवळ हिंसेवरच भीस्त असलेले आणि हिंसेनेच सगळे प्रश्न सोडवता येतात, अशी 'भीती' बाळगणारेही लोकलच्या प्रवासात असतातच. ही मंडळी चावी, नेलकटर, बॅगेचाच हत्यारासारखा वापर करून एकमेकांवर हल्ले करताना रेल्वेच्या प्रवासात अनेकदा दिसते. हाणामारी, भांडणे, मारामारी ही लोकलच्या प्रवासातली नियमित बाब आहे. मात्र ती चाकू किंवा तत्सम हत्यार भोसकून हत्या करण्यापर्यंत प्रवाशांची जाणारी मजल अत्यंत धोकादायक आहे. मुंबई ठाणेकरांचा संयम आता संपला असल्याचे निदर्शक आहे. लोकलमध्ये प्राध्यापकाची झालेली हत्या पूर्वनियोजित नसेल किंवा तणाव उन्मादातून किरकोळ कारणाने झालेली असली तरी त्याची मानसशास्त्रीय कारणे शोधण्याची गरज आहे. लोकलमध्ये एका पायावर उभे राहायला मिळणे म्हणजेच प्रवासातील सुख मानावे लागण्याच्या हतबल स्थितीच्या पलीकडे आपण गेलेलो आहोत. लोकलच्या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कामाच्या वेळा बदलणे, ट्रेनला स्वयंचलित दरवाजे बसवणे, अशा अनेक उपायांवर खूप चर्चा झाली. मुंबई ठाण्यातील उपनगरांतील लोकसंख्या पाहता उपलब्ध लोकल्सपेक्षा तिपटीने लोकल गाड्यांची गरज आहे. निदान गर्दीच्या वेळेत किंवा मेगा ब्लॉकच्या काळात तरी. मात्र मुंबई ठाण्याची रचना पाहता आता हे शक्य नाही. त्यामुळे पर्यायी वाहतुकीची साधने उपलब्ध व्हायला हवीत. सामान्य माणसाच्या जगण्यातील तणाव प्रचंड वाढलेला आहे. नोकरी टिकवणे, कार्यालयातील लेटमार्कमुळे वेतनकपात, कामातील रोजची आव्हाने आणि स्पर्धा वाढत आहे. कौटुंबिक गरजांबाबत कोणतीही शाश्वती नाही. घरकर्ज, इतर हप्ते, वेळेचे नियोजन, कुटुंबाच्या अपेक्षांची तजवीज, अशा अनेक गोष्टी निभावताना माणसांना स्वतःसाठी वेळ मिळतंच नाही. या सामान्य लोकल प्रवाशावरील कुटुंब आणि भवतालकडून असलेल्या अपेक्षांचा बोजा आताच्या काळात त्याच्या क्षमतेपलीकडे गेला आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,३ फेब्रुवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६

सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने घेतला गळफास

पहिली मुलगी अन् दुसऱ्यांदाही मुलगीच असल्याचं कळताच केला जबरदस्ती गर्भपात...



पुणे, पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणाची चर्चा अजून थांबलेली नाही, तोच उरुळी कांचन परिसरातून आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. समाजात सुसंस्कृतपणाचा मुखवटा लावून वावरणाऱ्या, पदं आणि प्रतिष्ठा मिरवणाऱ्या कुटुंबात एका उच्चशिक्षित इंजिनियर विवाहितेला हुंडा, संशय, अपमान आणि 'वंशाला दिवा हवा' अशा विकृत आग्रहामुळे जीव गमवावा लागला. सासू सरपंच, सासरे शिक्षकङ्ख पण घरातल्या चार भिंतीआड अमानवी छळ सुरू होता. अखेर या सगळ्याला कंटाळून इंजिनियर दीप्ती मगर-चौधरीने आत्महत्या केली आणि पुणे पुन्हा एकदा हादरलं.

दीप्ती मगर-चौधरीने केली आत्महत्या

उरुळी कांचनजवळील सोरतापवाडी येथे राहणाऱ्या दीप्ती मगर-चौधरी (वय २७) या पेशाने इंजिनियर असलेल्या विवाहितेने २५ जानेवारी रोजी रात्री आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे, अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकलीसमोर तिने हे टोकाचं पाऊल उचललं. दीप्तीचा मृत्यू हा आत्महत्या असल्याचं प्राथमिक तपासात स्पष्ट झालं असलं, तरी तिच्यामागे असलेली कहाणी अंगावर शहारे आणणारी आहे.

अखेर आत्महत्या; तिन्ही वर्षांच्या मुलीसमोर टोकाचं पाऊल

सततचा छळ, अपमान, संशय, पैशांची मागणी आणि जबरदस्तीचा गर्भपातङ्ख या सगळ्याला कंटाळून २५ जानेवारीच्या रात्री दीप्तीने आपल्या राहत्या घरी गळफास घेतला. तिच्या मृत्यूने संपूर्ण सोरतापवाडी हादरली.

पती, सासू-सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

दीप्तीची आई हेमलता मगर यांनी दिलेल्या तक्रारीवरून उरुळी कांचन पोलिसांनी पती रोहन चौधरी, सासू व सरपंच सुनीता चौधरी, सासरे कारभारी चौधरी आणि दीर रोहित चौधरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पती आणि सासूला अटक करण्यात आली असून, त्यांना ३० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सासरे आणि दीर फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भेट

या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मंगळवारी दीप्तीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत, ''हा केवळ आत्महत्येचा नव्हे, तर हुंडाबळीचा प्रकार आहे,'' असं स्पष्ट केलं.

गर्भपाताची स्वतंत्र चौकशी

रुपाली चाकणकर यांनी सांगितलं की, गर्भपात कोणत्या रुग्णालयात करण्यात आला, कोणी केला, कोणाच्या सांगण्यावरून केला याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आदेश वैद्यकीय विभाग आणि पोलिसांना देण्यात आले आहेत.

लग्नानंतर काही महिन्यांतच छळाला सुरुवात

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती आणि रोहन चौधरी यांचा विवाह २०१९ मध्ये पार पडला होता. लग्नावेळी माहेरकडून सुमारे ५० तोळे सोनं देण्यात आलं होतं. सुरुवातीचे काही महिने सुरळीत गेले, मात्र त्यानंतर दीप्तीच्या आयुष्यात छळ, संशय आणि अपमानाची मालिका सुरू झाली.

'दिसायला सुंदर नाहीस', 'घरकाम येत नाही' - मानसिक छळ

दीप्तीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर दीप्तीच्या चारित्र्यावर संशय घेतला जाऊ लागला. ''तू दिसायला सुंदर नाहीस'', ''तुला घरातली कामं जमत नाहीत'', ''शेतात राबणाऱ्या बाया तुज्यापेक्षा बऱ्या'' अशा शब्दांत तिला सातत्याने अपमानित करण्यात येत होतं. पती, सासू-सासरे आणि दीर यांच्याकडून मानसिक आणि शारीरिक छळ सुरूच होता.

व्यवसाय, गाडीङ्ख आणि माहेरून पैशांची सतत मागणी

पती रोहन चौधरी याचा एक्सपोर्टचा व्यवसाय बंद पडल्याचं कारण पुढे करत दीप्तीकडे माहेरून पैसे आणण्याची मागणी करण्यात आली. मुलीचा संसार वाचावा म्हणून दीप्तीच्या आई-वडिलांनी एकदा तब्बल १० लाख रुपये रोख दिले. मात्र यावरही समाधान न झाल्याने, चारचाकी गाडी घेण्यासाठी पुन्हा २५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. अखेर माहेरकडून एकूण सुमारे ३५ लाख रुपये देण्यात आले.

५० तोळे स्त्रीधन बळकावल्याचा आरोप

लग्नात दिलेलं सुमारे ५० तोळे सोनं चोरीची भीती दाखवून सासू आणि पतीने दीप्तीकडून काढून घेतल्याचा आरोप आहे. नंतर विचारणा केल्यावर हे सोनं व्यवसायासाठी बँकेत गहाण ठेवल्याचं तिला सांगण्यात आलं. दीप्तीचं स्वतःचं स्त्रीधनही तिच्या हातात राहिलं नाही.

मुलगी झाल्यावर नाराजी, 'वंशाला दिवा हवा' असा विकृत हट्ट

दीप्तीला पहिली मुलगी झाली. मात्र मुलगी झाल्याने सासरच्यांची नाराजी वाढली. 'वंशाला दिवा हवा' हा विकृत आग्रह घरात सतत ऐकवला जाऊ लागला. याच मानसिक दबावात दीप्ती आणखी खचत गेली.

२०२५ मध्ये जबरदस्तीने गर्भलिंग निदान, त्यानंतर गर्भपात

नोव्हेंबर २०२५ मध्ये दीप्ती पुन्हा गर्भवती होती. पाच महिन्यांची गरोदर असताना सासरच्यांनी तिच्यावर जबरदस्तीने गर्भलिंग निदान चाचणी करण्यासाठी दबाव टाकला. पोटातील बाळ मुलगी असल्याचं समजताच, दीप्तीचा विरोध डावलून तिचा जबरदस्तीने गर्भपात करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेनंतर दीप्ती पूर्णपणे कोलमडली होती.

सरपंच सासू, शिक्षक सासरे... पण घरात अमानवी वागणूक

ऑक्टोबर २०२५ मध्ये दीप्तीच्या सासू सुनीता चौधरी या सोरतापवाडीच्या सरपंच झाल्या. निवडणूक, राजकीय प्रतिष्ठा आणि 'मोठेपणा' दाखवण्यासाठी पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. तसेच माहेरच्या रो-हाऊस स्कीममध्ये हिस्सा मागण्यासाठीही दीप्तीवर दबाव टाकण्यात आल्याचं तक्रारीत नमूद आहे.

नॅशनल पार्कमधील अतिक्रमण कारवाई स्थगित... आदिवासींना दिलासा

मुंबई । मुंबईतील संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये आदिवासी पाड्यांवर सुरू असलेल्या अतिक्रमण कारवाईमुळे गेल्या दोन दिवसांपासून तणाव निर्माण झाला होता. वनविभाग आणि स्थानिक आदिवासी नागरिक यांच्यात संघर्ष वाढल्याने परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अखेर वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर मंगळवारी या कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कारवाई थांबताच नॅशनल पार्क परिसरातील तणाव निवळून आदिवासींना दिलासा मिळाला आहे. बोरिवली येथील संजय गांधी नॅशनल पार्क परिसरात स्थानिक आदिवासी नागरिक आणि वनविभाग यांच्यात मागील दोन दिवसांपासून संघर्ष सुरू होता. अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईदरम्यान दोन्ही बाजूंमध्ये जोरदार वाद झाला असून परिसरात तणावाचे वातावरण होते.

मंगळवारी दुसऱ्या दिवशीही घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नॅशनल पार्कच्या आतमध्ये राहणारे आदिवासी आणि पोलीस यांच्यामध्ये मोठी झटापट झाली. आदिवासींच्या बेकायदा घरांवर कारवाई करताना पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. कारवाईच्या विरोधात आदिवास समाज एकवटला होता. दरम्यान, पोलिसांवर दगडफेक करणाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. या दगडफेकीत काही पोलीस जखमी झाल्याचीही माहिती आहे.

मात्र, ही सर्व कारवाई मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार होत असल्याचे संजय गांधी नॅशनल पार्क प्रशासनाकडून सांगण्यात आले. या सगळ्या गोंधळानंतर तणावाच वातावरण निर्माण झाल्याने संजय गांधी नॅशनल पार्क मंगळवारच्या दिवशी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. संजय गांधी नॅशनल पार्कच्या बाहेर मुख्य गेटवर बॅरिगेटिंग केली असून पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला आहे.



एकनाथ शिंदेंच्या घराबाहेर निदर्शने

आदिवासींच्या घरावर बुलडोझर कारवाई करण्याच्या निषेधार्थ, नॅशनल पार्कच्या क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानाबाहेर सोमवारी रात्री निदर्शने केली. राज्य आदिवासी विकास समितीचे अध्यक्ष विवेक पंडित म्हणाले की, २०१८ च्या पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी होईपर्यंत आणि बाधित कुटुंबांचे पुनर्वसन होईपर्यंत घरे पाडली जाऊ नयेत. पुनर्वसन योजनेवर चर्चा केली जाईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर आदिवासींनी आपले आंदोलन मागे घेतले.

आणखी एका विमानाचा भीषण अपघात टळला

माजी उपमुख्यमंत्री थोडक्यात बचावले



मुंबई ।महाराष्ट्रात मोठा विमान अपघात घडला आहे, या विमान अपघातामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झालं आहे. अजित पवार हे मुंबईवरून विमानानं बारामतीला निघाले होते, मात्र धावपट्टीवर विमान उतरवताना नियंत्रण सुटलं आणि हे विमान जमिनीला धडकल्याची माहिती समोर येत आहे, त्यानंतर मोठा स्फोट होऊन विमानाला आग लागली. दरम्यान ही विमान अपघाताची घटना ताजी असतानाच आता आणखी एक मोठा विमान अपघात थोडक्यात टळला आहे. जयपूरमध्ये ही घटना घडली आहे, एअर इंडियाच्या विमानाचं लँडिंग फेल झाल्याची घटना घडली आहे. या विमानातून पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि राजस्थानचे काँग्रेस प्रभारी सुखजिंदर सिंह रंधवा हे देखील प्रवास करत होते. या घटनेतून ते थोडक्यात वाचले आहेत. एअर इंडियाचं हे प्लेन दिल्लीवरून जयपूरला निघाले होते. समोर आलेल्या माहितीनुसार एअर इंडियाचं विमान एआय - १७१९ दुपारी १ वाजून ५ मिनिटांनी जयपूर एअरपोर्टवर पोहोचलं. त्यानंतर या विमानानं विमानतळावर लँडिंगचा प्रयत्न केला. मात्र हे विमान जसं धावपट्टीवर उतरलं तसं त्याचं लँडिंग फेल झालं. धावपट्टीवरील खराब स्थिती किंवा काही तांत्रिक समस्येमुळे या विमानाचं पहिलं लँडिंग फेल झाल्याचं बोललं जात आहे. दरम्यान या विमानाचं पहिलं लँडिंग फेल होताच पायलटच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला आहे. विमान जसं रन वेला टच झालं, त्यानंतर लगेचच पायलटने प्लेन ला गो अराउंड केलं. तब्बल १० मिनटं हवेत घिरट्या घातल्यानंतर अखेर दुसऱ्या प्रयत्नामध्ये या विमानाचं धावपट्टीवर सुरक्षित लँडिग झालं आहे. या विमानातून प्रवास करणारे पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखजिंदर सिंह रंधवा हे पूर्णपणे सुरक्षित आहेत.

मुंबईतील मालवणी परिसरात सिलिंडर ब्लास्ट... चाळीला आग



मुंबई । मुंबईतील मालवणी परिसरात हादरवून टाकणारा प्रकार उघडकीस आला आहे. एका गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन मालवणी गेट क्रमांक ८ जवळ भारतमाता शाळेजवळील एसी मशिदीनजीकच्या चाळीत २७ जानेवारी रोजी मंगळवारी सकाळी ही घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेत चाळीला आग लागली आहे. सकाळी ९:२५ वाजता बीएमसी अग्निशमन दलाला या घटनेची माहिती देण्यात आल्याचे वृत्त आहे. अग्निशमन दल, पोलीस, तसेच संबंधित वीज वितरण कंपनीच्या कर्मचारी रुग्णवाहिका आणि बीएमसी वॉर्ड कर्मचारी तातडीने घटनास्थळी धावून आले होते.

पहिल्या मजल्यावर काही प्रमाणात आग होती, ज्यात सिलिंडरचा मुख्य व्हॉल्व्ह, गॅस स्टोव्ह, एलपीजी सिलिंडर, एस शीट, घरगुती वस्तू, अन्नपदार्न्त आणि गाद्या देखील होत्या. अग्निळशमन दलाने सकाळी ९:४२ वाजेपर्यंत आग आटोक्यात आणली. या घटनेत एकूण सात जण गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमीपैकी चार जणांना आधार रुग्णालयात आणि तिघांना केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. काहींची प्रकृती ही गंभीर जखमी असल्याचे वृत्त आहे. सर्वांवर सध्या तपास सुरु असल्याचं बोललं जातंय.

प्रजासत्ताक दिनी फुग्यात गॅस भरताना सिलिंडरचा झाला स्फोट, दुर्घटनेत सात जण गंभीर जखमी

मालेगावात पोलीस परेडच्या मैदानापासून काही अंतरावर एका फुगे विक्रेत्याच्या नायट्रोजन गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या झालेल्या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे. या घटनेनं परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. या स्फोटात एकूण सात जण गंभीर जखमी झाले आहेत. राष्ट्रध्वजाला वंदन करताना ही धक्कादायक घटना घडली आहे.

सोमवारी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी पोलीस परेड ग्राउंडवर राष्ट्रध्वजाला वंदन करण्यासाठी कार्यक्रम सुरु करण्यात आला होता. अतिरिक्त जिल्हाधिकारी वरिष्ठ पोलीस अधिकारी, मोठ्या संख्येनं शालेय विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते. परेड ग्राउंडपासून सुमारे २५० किमी अंतरावर एक फुगे विक्रेता नायट्रोजन गॅसने फुगे भरून विक्रीचे काम करत होते. त्याच क्षणी, गॅस भरताना सिलिंडरमध्ये मोठा स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की, तो दूरवर ऐकू आला, नंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.



एकूण सात जण स्फोटात जखमी

प्रजासत्ताक दिनासाठी फुगे खरेदी करण्यासाठी काही नागरिकांनी विक्रेत्याभोवती गर्दी केली होती, तेव्हाच हा दुदैवी प्रकार उघडकीस आला. या अपघातात विनोद थोरात, मोहित जाधव, अतुल शेवाळे, प्रमिला जाधव आणि उज्ज्वला महाजन यांच्यासह इतर एकूण सात जण या स्फोटात जखमी झाले. दोन मुलं, दोन महिलांसह इतर आणखी दोघे जण गंभीर जखमी झालेत. सर्व जखमींना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

संबंधित घटनेची माहिती पोलिसांना समजताच, पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी तात्काळपणे घटनास्थळी पोहोचले आणि परिसराला घेराव घातला. नंतर फुगे फुगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायट्रोजन गॅस सिलिंडरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने हा स्फोट झाल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले. या घटनेनं आनंदाच्या दिवसाला विरजन प्राप्त झालं आणि पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

मद्यपी चालकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करा!

मुंबई । कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या एसटीच्या चालक व इतर कर्मचाऱ्यांना कोणतीही तडजोड न करता तातडीने निलंबित करण्याचे सक्त निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. आज मुंबईतील परळ बसस्थानकाला दिलेल्या अचानक भेटीदरम्यान मंत्री सरनाईक यांनी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी विश्रांतीगृहांमध्ये अनेक ठिकाणी दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या, तसेच काही कर्मचाऱ्यांकडून मद्यपान केल्याची दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास आले. या गंभीर प्रकारामुळे संतप्त झालेल्या मंत्री सरनाईक यांनी तेथे उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, ''परगावी कर्तव्य बजावणाऱ्या चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मात्र, अशा ठिकाणी मद्यपानासारखे निंदनीय कृत्य घडत असेल, तर ते केवळ शिस्तभंग नाही तर प्रवाशांच्या जीवाशी थेट खेळ करणारे अत्यंत धोकादायक कृत्य आहे.मद्यपान करून कर्तव्यावर जाणारा कर्मचारी केवळ अपघाताला निमंत्रण देत नाही, तर एसटीच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासावरही प्रश्नचिन्ह निर्माण करतो. अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांना चौकशीअंती सेवेतून बडतर्फ केले पाहिजे,'' असा इशाराही त्यांनी दिला. मात्र, अशा प्रकारांना वेळीच आळा न घालणारे अकार्यक्षम अधिकारीही तितकेच जबाबदार असल्याचे स्पष्ट करत मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीचे सुरक्षा व दक्षता खाते आणि संबंधित अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळेच अशा बेशिस्त वर्तनाला खतपाणी मिळते. त्यामुळे संबंधित सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



यापुढे कर्तव्यावर जाणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची, विशेषतः चालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे चाचणी अनिवार्य करण्यात यावी. चाचणीत दोष आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेशही मंत्री सरनाईक यांनी दिले. तसेच आज आढळून आलेल्या गैरप्रकारांबाबत स्वतंत्र विभागीय चौकशी समिती नेमून, अहवालाच्या आधारे दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. या दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रसाधनगृहे आणि बसेसच्या नियोजनाचीही पाहणी केली. प्रवाशांच्या सुरक्षितता व सुखसुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com